M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी नवी मुंबई - 400 703.

क्र.मुविम /माध्य.परीक्षा /१९६३
वाशी नवी मुंबई
दिनांक : २७/०३/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक
संबंधितमंडळ मान्यताप्राप्त
माध्यमिक शाळा
ठाणे,रायगड पालघर,
मुंबई पश्चिम,दक्षिण,उत्तर.

विषय - नाव दूरुस्ती /कलागुण सादर प्रकरणे इत्यादी संदर्भात त्वरित कार्यवाही पूर्ण करण्याबाबत

संदर्भ -१) क्र./रा.म/परीक्षा-०७/१६५/१६/०१/२०२६ चे पत्र

वरील विषयास अनुसरून आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की,माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फ्रेबु, मार्च २०२६ परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे नाव दुरुस्ती / कला गुणवाढ प्रस्ताव मुख्याध्यापकांच्या शिफारसीसह अंतिम दिनांक ०९/०३/२०२६ पर्यंत ऑनलाइन या कार्यालयात प्राप्त झालेले आहेत.

सदर प्रस्तावावर कार्यवाही चालू असुन प्रकरणाचा निपटारा शीघ्रतेने होणे क्रमप्राप्त आहे. मात्र ,बरीच दुरुस्ती प्रकरणे आजही शाळेच्या डेस्कवर अनुक्रमे verified / Draft मध्ये विनाकार्यवाही तशीच प्रलंबित असल्याचे दिसुन येत आहे. सदर काम हे कालमर्यादीत काम असल्याने ते वेळेत पुर्ण न झाल्यास त्यावर आधारित पुढील तांत्रिक कामे प्रलंबित राहून निकाल प्रक्रियेवर त्याचा एकंदरीत परिणाम होतो .

सबब,डेस्कवरील सबंधित प्रस्ताव अनुक्रमे Verified/Draft/Incomplete/Approved by school /Status ला असल्यास त्यात येणाऱ्या अडचणींचे निरसन करुन घेऊन / थेट मंडळाशी त्वरित संपर्क साधून कार्यवाही वेळेत पूर्ण करावी . तेसेच, शालेय desk वरील सर्व विद्यार्थ्यांबाबत विषयानुरूप अंतिम कार्यवाही झाली आहे किंवा नाही याची खातरजमा मुख्याध्यापकांनी स्वत: करावयाची आहे. तत्पश्चात, कला प्रस्तावसंदर्भात कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिवाकरिता
मुंबई विभागीय मंडळ
वाशी नवी मुंबई ४००७०३

प्रत महितीस्तव
सचिव,
राज्यमंडळ, शिवाजीनगर
पुणे- ४११००४